# प्रेस नोट

**दिनांक ०५.०८.२०२२**

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत सागरी पोलीस ठाणे किनारी सुरक्षा जागरूकता आणि डेटा संकलन करणे याबाबत सागर रक्षक दल सदस्य व मच्छिमार बांधव मोहिम राबविणे आयोजित केलेबाबत.**

भारतीय नौदलाच्या पथकाकडून प्रत्येक जिल्हाच्या अंतर्गत असलेल्या विविध मासेमारी गावांमध्ये सागरी/ खाडी किनारी भागातील गावांमध्ये सागरी पोलीस ठाणे किनारी भागात सुरक्षा जागरूकता आणि डेटा संकलन मोहिम राबविण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने, **मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई श्री. बिपिनकुमार सिंग व मा. पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई श्री. डॉ. जय जाधव यांचे सुचनेनुसार व मा.पोलीस उप आयुक्त,विशेष शाखा, नवी मुंबई श्रीमती. रूपाली अंबुरे** यांचे मार्गदर्शनाप्रमाणे सागरी पोलीस ठाणे किनारी भागात सुरक्षा जागरूकता आणि डेटा संकलन मोहिम **दिनांक ०५ ऑगस्ट २०२२ रोजी एनआरआय सागरी पोलीस ठाणे हद्दीत स्वाध्याय परिवार दिवाळे कोळीवाडा, नवी मुंबई येथे ११.०० वाजता** भारतीय नौदलाचे पथकातर्फे समुदाय संपर्क अभियान भारतीय नौदल व सागरी सुरक्षा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले. सदरचे अभियान मासेमारी बांधव, सागर रक्षक दल व ग्राम रक्षक दल सदस्य यांचेकरिता सागरी सुरक्षा जागरूकता तसेच सागरी सुरक्षितेच्या दृष्टीने सतर्कता आणण्याकरिता भारतीय नौदलाचे लेफ्टनंट कमांडर श्री. डेविड सिंह, कोस्ट गार्ड प्रधान अधिकारी, श्री. पी. एम. सतदेव, ओएनजीसीचे सुरक्षा निरीक्षक अधिकारी, श्री. स्वनिल आर. ठाकुर व श्री. सुनिल कुमार असे पथक आले होते.

सदर अभियानामध्ये सागरी सुरक्षा संदर्भात व सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने भारतीय नौदलाचे पथकांकडून उपस्थित मासेमारी सोसायटी अध्क्षय, मच्छिमार बांधव, सागर रक्षक दल व ग्राम रक्षक दल सदस्य यांना सांगितले की, मासेमारी बांधव यांनी मासेमारीकरिता खोल समुद्रात जाताना सतर्क देवाण-घेवाण करणेकरिता व्ही.एच.एफ वायरलेस सेट, मोबाईल फोन सोबत घेवुन जाणे, बोटींमध्ये सुरक्षेकरिता जीव रक्षक साधन सामुग्री जवळ बाळगणे व मासेमारी करिता जे मार्ग देण्यात आलेले आहेत त्याच मार्गाचा वापर करण्यात यावा.

तसेच मासेमारी करीत असताना नियमितपणे बोटींची मुळ कागदपत्रे व बोटीवर असलेल्या प्रत्येकाकडे फोटो, आयडी कार्ड जवळ बाळगणे. समुद्रात कोणत्याही प्रकारची अनोळखी बोट आढळुन आल्यास तात्काळ दुरध्वनी क्रमांक २२७५१०२६/१०२२/१०३१ वर तसेच एम.आर.सी.सी.टोल फ्री क्रं. १५५४, ओएनजीसी हेल्पलाईन १८००२२१९५६ वर संपर्क करणे याबाबत सागरी सुरक्षितेच्या अनुषंगाने योग्य ते मार्गदर्शन करून सुचना देवुन त्यांना सागरी सुरक्षा संदर्भात महत्व पटवून दिले.

मा. पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई श्रीमती. रूपाली अंबुरे यांचे मार्गदर्शना खालील, सागरी सुरक्षा शाखा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीकांत धरणे, नवी मुंबई यांनी उपस्थित मच्छिमार बांधव, मासेमारी सोसायटी अध्यक्ष व सागर रक्षक दल सदस्य त्यांच्याशी संवाद साधुन सांगितले की, सागर रक्षक दल/ग्रामरक्षक दल/मच्छिमार बांधव हे सागरी सुरक्षेचे डोळे व कान असुन त्यांनी सागरी सुरक्षेच्या संदर्भात सतर्क राहुन सागरी/खाडी किनारीभागात संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवुन सदरची माहिती तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास दिल्यास पुढील योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करणे सोईचे होईल. तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे सागरी सुरक्षेसंदर्भात सुरू करण्यात आलेल्या **कोस्टल हेल्पलाईन क्रमांक १०९३ ची उपस्थितांना माहिती दिली व सदर हेल्पलाईनचा वापर करण्याबाबत आवाहन केले**.

सदर अभियानामध्ये भारतीय नौदलाचे लेफ्टनंट कमांडर श्री. डेविड सिंह, कोस्ट गार्ड प्रधान अधिकारी, श्री. पी. एम. सतदेव, ओएनजीसी चे सुरक्षा निरीक्षक अधिकारी, श्री. स्वनिल आर. ठाकुर व श्री. सुनिल कुमार, सागरी सुरक्षा शाखा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. श्रीकांत धरणे, एनआरआय सागरी पोलीस ठाणे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील, सागरी सुरक्षा शाखा, नौका विभाग, श्री. साईनाथ दळवी, मत्स्यविकास अधिकारी पालघर श्री.नंदकुमार पाटील ,खांदेवाले मासेमारी सोसायटी अध्यक्ष श्री. रमेश हिंडे , डोलकर मासेमारी सोसायटी अध्यक्ष श्री. पांडुरंग कोळी, फगवाले मासेमारी सोसायटी अध्यक्ष श्री. भालचंद्र कोळी व जेष्ठ नागरीक संस्था अध्यक्ष चंद्रकांत कोळी, दिवाळे कोळीवाडा सामाजिक संस्था अध्यक्ष भुषण कोळी व सागरी/खाडी किनारी गावातील सुमारे १५० सागर रक्षक दल सदस्य, मच्छिमार बांधव उपस्थित होते.

------------------------------




नवी मुंबई पोलीस आयुक्तालय
सागर रक्षक दल व मच्छीमार बांधव
सागरी सुरक्षा जन जागृती अभियान
INTERACTION PROGRAMME
CO-ORDINATED BY
INDIAN NAVY
IN ASSOCIATION WITH